# 'टीसीएस आयटी विझ २०१६' २७ सप्टेंबरला

**लोकशाही वार्ता/नागपूर**

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या आयटी क्षेत्रातील अग्रगण्य सल्लागार व व्यवसाय कंपनीतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी टीसीएस आयटी विझ या भारतातील सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान विषयक प्रश्नमंजुषेचे आयोजन २७ सप्टेंबरला शहरातील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह येथे करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नसून यात ८ वी ते १२ वी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. प्रत्येक शाळेतून दोन विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी होऊ शकेल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संस्थातर्फे २४ सप्टेंबरपर्यंत प्रवेशिका मागविण्यात आल्या असून, प्रवेश नोंदणीसाठी प्रशांत कोपरकर अग्रवाल हाऊस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सीताबर्डी येथे संपर्क साधावा. अथवा डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.टीसीएसवीझ.कॉम या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करता येईल. संपूर्ण देशात १५ ठिकाणी या आयटी विझचे आयोजन करण्यात आले असून यात अहमदाबाद, बेंगळुरु, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदोर, कोची, कोलकता, लखनौ, मुंबई, नागपूर, पुणे व विशाखापट्टणम आदींचा समावेश आहे.